
म.फु.कृ.वि/ विस्तार/ प्रकाशन क्र./२१०८/२०१७

# यशस्वी शेळीपालनाची पंचसुत्री





## शेतकरी प्रथम कार्यक्रम

### भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली

भाकृअनुप
ICAR

महात्मा फुले कृषि विद्यापीठ
राहुरी – ४१३ ७२२, जि. अहमदनगर

# यशस्वी शेळीपालनाची पंचसुत्री

## १. पैदास

- शेळी पालन कुठे करणार ?
- शेळी पालन कशासाठी ? दुध/मांसोत्पादन
- जनावरांची निवड करतांना खालील सुत्राचा वापर करावा
  **जावई–जात–वय–ईष्ट गुणधर्म**

### जात

### महाराष्ट्रातील विभागानिहाय शेळ्यांच्या जाती

#### संगमनेरी (अहमदनगर, पुणे व नाशिक जिल्ह्याचा काही भाग)

- मुळ स्थान : अहमदनगर, नाशिक व पुणे
- उद्देश : दुध व मांस उत्पादन
- आकार : मध्यम




#### उस्मानाबादी (मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्र)

- मुळ स्थान : महाराष्ट्र राज्यातील उस्मानाबाद, सोलापूर व अहमदनगर
- उद्देश : मांस उत्पादनासाठी
- आकार : मध्यम



#### बेरारी (विदर्भ)

- मुळ स्थान : नागपूर, वर्धा, अकोला
- उद्देश : मांस उत्पादन
- आकार : मध्यम



#### कोकण कण्याळ (कोकण)

- मुळ स्थान : सिंधुदुर्ग
- उद्देश : मांस उत्पादनासाठी
- आकार : मध्यम



### वय

सर्वसाधारणपणे नर व मादीचे वय २ ते ५ वर्ष असावे

### नरासाठी

- ३० ते ३५ माद्यांसाठी दोन ते तीन वर्ष वयाचा नर आसावा.
- ५० ते ६० माद्यांसाठी तीन ते पाच वर्ष वयाचा एक नर आवश्यक असतो.
- नर जास्तीत जास्त ५ वर्ष वयापर्यंत वापरावा.
- दर  दोन वर्षांनी नर बदलावा.

### मादीसाठी

- शक्यतो १ वर्षापुढील वयाच्या माद्या खरेदी कराव्यात.
- मादीचे उत्पादनक्षम वय ७ ते ८ वर्ष असते.

## ईष्ट गुणधर्म


### नरासाठी



- पैदाशीसाठी जुळ्यातील एक  सुदृढ नर निवडावा.
- पुढील  पाय सरळ असावेत.
- ओठ बारीक, नाकपुड्या मोठ्या असाव्यात.
- डोळे पाणीदार असावेत.
- मान जाड  असावी तसेच मानेवर भरपूर आयाळ असलेला नर निवडावा.
- छाती भरदार, पुढील दोन पायातली अंतर नऊ ईंचापेक्षा जास्त असावे.
- दोन्ही वृषण  व्यवस्थीत असावेत.
- अंडकोष लोंबते नसावे.
- नर चपळ, उत्तम  पौरुषत्व असणारा असावा.

### माद्यांसाठी

- पुढील पाय सरळ मागील पायाचे गुडघे कोणदार असावेत.
- मागील पायात पुरेसे अंतर असावे, जेणेकरुन कास भरदार राहील.
- कास मऊ, केस नसलेली, अर्धगोलाकार व पोटाला चिकटलेली असावी.
- स्वभावाने गरीब व पिलांची चांगली काळजी घेणारी असावी.
- नियमीत माजावर येवून दोन वर्षात तीन वेळा विणारी.
- दुग्धोत्पादन चांगले असून शांतपणे पिलांना पाजणारी.
- जुळे करडे देणारी मादीच शक्यतो निवडावी.



## २. आहार व्यवस्थापन

### करडांचा आहार



- करडांना जन्मल्याबरोबर आईचा चिक वजनाचे १० टक्के, आर्ध्या तासाचे आत पाजावा म्हणजे रोगप्रतिकार क्षमता वाढते.
- दूध तीन महिने वयापर्यंत पाजावे.
- पहिल्या पंधरवाड्यानंतर थोडे पशुखाद्य व वाळलेला चारा चघळण्याची सवय लागु द्यावी.

### खाद्याचे प्रमाण वयानुसार खालील प्रमाणे वाढवीत जावे

१) एक ते दोन महीने ५० ते १०० ग्रॅम खाद्य २) दोन ते तीन महिने १०० ते १५० ग्रॅम खाद्य ३) तीन ते चार महीने २०० ते २५० ग्रॅम खाद्य ४) चार महिन्यानंतर ३५० ते ५०० ग्रॅम खाद्य

### माद्यांचा आहार

- चराऊ पध्दतीत ६ ते ८ तास चारणे गरजेचे असते.
- बंदिस्त शेळीपालनात एका शेळीला ४ किलो हिरवा चारा व एक किलो वाळलेला चारा द्यावा.
- चाराऊ कुरणात चाऱ्याचा तुटवडा असल्यास १ किलो हिरवा चारा व ५०० ग्रॅम वाळलेला चारा रात्रीचे वेळी पुरवावा.
- ३५० ग्रॅम पशुखाद्य रोज द्यावे.
- पैदास हंगामात ५०० ग्रॅम पर्यंत खाद्य वाढवावे म्हणजे जुळयांचे प्रमाण वाढते.
- विण्यापुर्वी दोन महिने खाद्य व आहार उत्तम ठेवावे म्हणजे वजनदार करडु जन्माला येईल व शेळीला दूध चांगले फुटेल तसेच करडु जोमाने वाढेल.
- नियमीत डहाळा करावा. लिंब, बाभुळ, बोर, अंजन यांचा जास्त वापर करावा कारण शेळ्या आपली ६० ते ७० टक्के भुक द्विदलचारा व झाडपाल्यावर भागवते.

### नरांचा आहार

- नरांना रोज ३५० ते ४०० ग्रॅम पशुखाद्य द्यावे.
- पैदास हंगामात प्रथीनयुक्त चारा, शेंगदाणापेंड, क्षार मिश्रण द्यावे.
- पैदास क्षमता वाढवण्यासाठी मोड आलेली मटकी द्यावी.

**पाणी -** १) शेळ्यांना दिवसातुन किमान एकदा तरी पाणी पाजावे.
२) साधारणपणे रोज २ ते ३ लिटर पाणी वातावरणानुसार पाजावे.

## ३. व्यवसायीक व्यवस्थापन

### करडांचे व्यवस्थापन



- करडु जन्मल्याबरेबर आईला चाटू द्यावे म्हणजे त्यांत मातृत्वाची भावना दृढ होते.
- नाकातील चिकट द्रव साफ करावा.
- करडांना अर्ध्या तासाचे आत चिक पाजावा.
- पंधरा दिवसानंतर थोडा वाळलेला चारा चघळु द्यावा.
- जोमदार वाढीसाठी (ईद करीता) ६० टक्के खाद्य व ४० टक्के चारा या प्रमाणात आहार द्यावा.
- सहा महिने वयात २० ते २५ किलोचे करडु विक्रीसाठी तयार होणे गरजेचे आहे.

### पैदास नराचे व्यवस्थापन



- दिड वर्षापेक्षा कमी वयाचा नर पैदाशीसाठी वापरु नये.
- नर कायम कळपात ठेवू नये.
- पैदास हंगामात पोटावरील केस कापावेत.
- दोन नर पैदास हंगामात शक्यतो एकत्र ठेवू नयेत म्हणजे त्यांच्यात मारामारी होणार नाही.
- पैदास हंगामात नरांना सकस प्रथीनयुक्त आहार द्यावा जेणेकरुन त्यांची प्रजनन क्षमता वाढेल.

### माद्यांचे व्यवस्थापन



- नऊ महिने ते एक वर्षापर्यंत माद्या वयात येतात.
- पैदास हंगामात मद्यांना सकस हिरवा चारा मिळेल याची काळजी घ्यावी.
- पैदास हंगामापुर्वी, गाभण काळातील शेवटच्या महिन्यात आहार व खाद्य वाढवावे, म्हणजे जुळ्यांचे प्रमाण वाढेल आणि वजनदार करडे जास्त मिळतील.
- गाभण व दुभत्या माद्यांच्या आहारात क्षार मिश्रणाचा वापर करावा.
- गाभण शेळ्या इतर कळपा पासुन वेगळ्या ठेवाव्यात.
- विलेल्या शेळीची काळजी घ्यावी, मागील भाग स्वच्छ धुवावा, सडे फोडावीत, करडू व्यवस्थीत पाजावे.

## चारण्याचे व्यवस्थापन



- उन्हाळ्यात सकाळी लवकर व संध्याकाळी उशीरापर्यंत शेळया चाराव्यात.
- हिवाळयात सुर्योदयानंतरच शेळ्या चारण्यास न्याव्यात कारण दव पडलेल्या गवतावर शेळ्या चारल्यास सर्दी व फुफ्फुसदाह तसेच घश्याचे आजार होण्याची शक्यता असते.
- साठवलेल्या पाणवठ्यावर जेथे गोगलगायी आहेत किंवा जेथे गोगलगायीचा वावर असेल अशा ठिकाण शेळ्या चारु नयेत.
- शेळ्या चारायला नेण्यापुर्वी बाभळीचा डहाळा, शेंगा खायला दिल्यास शेळ्या छान चरतील.
- आठवड्यातुन एकदा लिंबाचा डहाळा अवश्य द्यावा म्हणजे जंताचे प्रमाण कमी होईल.

## गोठ्याचे व्यवस्थापन

- कमीत–कमी खर्चात, उपलब्ध साधन–सामुग्रीचा वापर करुन गोठे बांधावेत.
- गोठ्यात गव्हाणी असल्याच पाहिजे.
- २४ तास स्वच्छ पिण्याचे पाण्याची सोय असावी.
- गोठ्याची लांबी पुर्व–पश्चिम अशी ठेवावी.
- गोठा कोरडा राहिल याची काळजी घ्यावी.
- आठवड्यातून किमान एकदा चुना भुरभुरावा.
- गाठ्यातील जमीन उत्तम निचरा असलेली, मुरमाची चांगली, शक्य असल्यास विटा अंथराव्यात.
- अती पावसाळी प्रदेशात शेळ्यांना बसण्यासाठी माचणाची व्यवस्था करावी.



## ४. आरोग्य व्यवस्थापन

**शेळ्यांच्या आरोग्यव्यवस्थापनात ३ महत्वाच्या बाबींकडे लक्ष द्यावे.**

- योग्य वेळी लसीकरण–शेळ्यामधील लसीकरणाचे पुस्तकी तक्ते न वापरता पशु वैद्यकाच्या सल्याने आंत्रविषार व पीपीआर या दोन आजारासाठी सक्तीने लसीकरण करुन घ्या.
- जंतनिमुर्लन वर्षातुन ३–४ वेळा दरवेळी वेगवेगळ्या जंतनाशकाचा वापर करुन पशुवैद्यकाच्या सल्याने करा.
- बाह्य कृमी जसे पीसवा, गोचीड, उवा यांचा वेळीच बंदोबस्त करा.

## ५. पणन/विक्री व्यवस्थापन

यशस्वी शेळीपालनाचे अत्यंत महत्वाचे सुत्र म्हणजे शेळ्यांचे विक्रीव्यवस्थापन. बहुतांशी शेळी व्यावसायिक शेळीपालन म्हणजे ईदसाठी बोकड विक्री या एकाच संकल्पनेतुन करतांना दिसून येतात. दुदैवाने ईदच्या बाजारात बोकडांची आवक वाढल्याने अपेक्षित भाव बोकडांना मिळत नाही व दुर्दैवाने बऱ्याचदा व्यवसाय तोट्यात येतो. शेळीपालन करतांना बाजारपेठेचा अभ्यास केल्यास लक्षात येईल की स्थानिक बाजारात एक वर्षाच्या आतले व २० ते २५ किलो वजनाच्या बोकडाच्या मांसासाठी मागणी आहे. या उलट ईदसाठी १ वर्षाच्या पुढचे व जास्तीत जास्त वजन असणारे बोकडांची खरेदी केली जातात. म्हणजेच ईदसाठी केलेले बोकड ईदच्या बाजारात विकले गेले नाहीतर पुढच्या ईद पर्यंत सांभाळण्याची जबाबदारी आपल्याला घ्यावी लागते आणि याच ठिकाणी शेळी पालकाचा निर्णय चुकतो. म्हणुनच आपल्याकडे जन्माला येणारे करडांपैकी विक्री करण्यासाठी खालील प्रमाणे नियोजन करावे.

- १०–१५ % बोकड पैदाशीसाठी विकावेत.
- १०–१५% बोकड ईदसाठी तयार करावेत.
- ४०–५०% बोकड स्थानिक बाजारात विक्रीसाठी तयार करावेत.
- बोकडांची विक्री करतांना शक्यतो वजनानुसारच करावी त्याकरिता

$$\frac{\text{बोकडांचे वजन} \times \text{प्रचलित मटणाचा दर}}{२}$$

- ईद/पैदाशीचे बोकड/पाठी विकतांना जास्त दर ठेवावा.

अशारितीने विक्री व्यवस्थापन केल्यास आपल्या व्यवसायात नफ्याचे प्रमाण वाढेल.

## नविन शेळीपालकासाठी काही धोक्याची  वळणे निर्देशित करित आहोत

- शेळीपालनात मुरघास, हायड्रापोनिकचा वापर.
- शेळ्यांची निर्यात.
- शेळ्यांमधील कृत्रिम रेतन.

किफायतशीर शेळी पालनासाठी स्थानिक जातींचा वापर करावा.

शेळी पालकांनो यशस्वी शेळीपालनासाठी दिलेल्या पंचसुत्रीचा वापर केल्यास आपला व्यवसाय कदापीही  तोट्यात येणार नाही हे निश्चित.




**मुख्य संपादक : डॉ. किरण कोकाटे, संचालक, विस्तार शिक्षण**

**संपादक :** डॉ. पंडित खर्डे, प्रमुख अन्वेषक, भा.कृ.अ.प. शेतकरी प्रथम कार्यक्रम

**सहसंपादक आणि लेखक :** डॉ. संजय मंडकमाले, वरिष्ठ शास्त्रज्ञ, अ.भा.स. संगमनेरी शेळी सुधार प्रकल्प, मफुकृवि, राहुरी

डॉ. संदिप पाटील, सह अन्वेषक, भा.कृ.अ.प. शेतकरी प्रथम कार्यक्रम

डॉ. सचिन सदाफळ, सह अन्वेषक, भा.कृ.अ.प. शेतकरी प्रथम कार्यक्रम

डॉ. भगवान देशमुख, सह अन्वेषक, भा.कृ.अ.प. शेतकरी प्रथम कार्यक्रम

श्री. दिनेश बिरारी, क.सं.स., अ.भा.स. संगमनेरी शेळी सुधार प्रकल्प


भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या आर्थिक सहाय्याने